ISBN NO. 978-93-85882-06-7

# SECOND UGC SPONSORED

## Two days international/interdisciplinary conference

**"BE THE CHANGE YOU WANT TO SEE IN THE WORLD"**
Mahatma Gandhi

ON

29th & 30th January 2016

GANDHI STUDY CENTER
LEARN FROM THE LEGEND
NEW ARTS, COMMERCE & SCIENCE COLLEGE, WARDHA - 442001

Organized by
Gandhi Study Center
New Art's Commerce & Science College,
Nalwadi, Wardha (M.S.)

BE THE CHANGE YOU WANT TO SEE IN THE WORLD

330

| | | | |
|---|---|---|---|
| 62 | ASST PROF MUKTESWAR DAS | GANDHIJI'S SHADOW ON ENVIRONMENTAL MOVEMENT | 228 |
| 63 | प्रा. संजय उगेमुगे | महात्मा गांधीचे सत्य आणि अहिंसेसंबंधी विचार | 232 |
| 64 | प्रा. डॉ. मेघा सवाने | महात्मा गांधीचे आर्थिक विचार | 234 |
| 65 | प्रा. प्रमोद तडस | महात्मा गांधीजींच्या विचारांची आवश्यकता | 237 |
| 66 | डॉ. अलका प्रदीप बालचाळे (सरोदे) | गांधी युगातील स्वातंत्र्य चळवळीतील स्त्रिया | 238 |
| 67 | कु. अर्चना नारायण धर्मे | महात्मा गांधी व अहिंसा | 241 |
| 68 | प्रा. आमले बबन परसराम | महात्मा गांधी यांचे ग्रामीण विकाससंबंधीचे विचार | 243 |
| 69 | प्रा. भिमाशंकर एम. डहाळके | महात्मा गांधी यांचेस्त्री विषयक विचार - एक अध्ययन | 245 |
| 70 | चौधरी प्रदीप विनायक | महात्मा गांधी यांचे राजकीय विचार आणि सद्यःस्थितीतील भारतीय लोकशाही | 248 |
| 71 | डॉ. सी. डी. पाखरे | महात्मा गांधीची स्त्री विषयक भूमिका | 250 |
| 72 | डॉ.संजीवन कदम | महात्मा गांधी यांचा स्त्रीवादी दृष्टिकोन | 252 |
| 73 | डॉ.सतीशमा. चंहादे | महात्मा गांधींचे आर्थिक विचार | 255 |
| 74 | प्रा. डॉ. विलास के भिमनवार | सत्याग्रह | 258 |
| 75 | सहाय्यक प्राध्यपक डॉ. महेन्द्र पांडुरंगजी गावंडे | महात्मा गांधी : सत्य व अहिंसा | 260 |
| 76 | डॉ. रमेश जी. सुरळकर | महात्मा गांधी आणि अहिंसा सिध्दांत | 263 |
| 77 | प्रा. काशीनाथवि. तरासे | महात्मा गांधींचे रचनात्मक कार्य | 266 |
| 78 | - डॉ.खासेराव हि. भैरव-पाटील | महात्मा गांधी यांनी सत्याग्रहाच्या माध्यमातुन मांडलेली लोकशाहीतील राष्ट्रीयत्व संदर्भातील इतिहास शास्त्रीय चिकित्सा | 270 |
| 79 | प्रा. किशोरकुमार मनोहरराव इंगळे प्रा. राजा मनोहर इंगळे | महात्मा गांधीचे अहिंसा विषयक विचार | 271 |
| 80 | प्रा.डॉ.आर.बी.लक्षटे प्रा.डॉ.अशोक टिपरसे | महात्मा गांधींचा स्त्रीवादी कार्यात्मक दृष्टीकोन | 274 |
| 81 | प्रा. लक्ष्मण शा. पवार | लोकशाहीत सत्याग्रहाची भूमिका | 279 |
| 82 | प्रा.मंगला अ. कडवे | " महात्मा गांधी आणि स्त्रिया " | 281 |
| 83 | प्रा.मनोज श्रीकृष्णराव पवार | महात्मागांधीआणिग्रामिणविकास | 283 |
| 84 | प्राचार्य डॉ. मारुती शिवराम माने | नैतिक, मानसिक आणि शारिरीक आरोग्याचा उत्तम मार्ग - गांधीवादी दृष्टीकोन. | 285 |
| 85 | डॉ. अभिजीत वि. वेरुळकर | आधुनिक काळात महात्मा गांधीजींच्या तत्वज्ञानाची उपयुक्तता | 287 |
| 86 | प्रा. डॉ.मिलींद भगत प्रा. मनोज सोनटक्के | माहात्मा गांधीचा भारतीय स्त्रि विषयक दुष्ट्रिकोन | 288 |
| 87 | सहा.प्रा.मोकासरे जी.टी. | महात्मा गांधी यांचे स्त्री विषयक विचार | 291 |
| 88 | डॉ पी.आर.पुंडकर | महात्मा गांधीजींची सत्याग्रह चळवळ | 292 |
| 89 | प्रा. प्रभाकर पुसदकर | **गांधींचा स्त्री विषयक दृष्टिकोण आणि स्वातंत्र्यापूर्वीच्या त्यांच्या सामाजिक, राजकीय आंदोलनातील महिलांची भूमिका, अस्मिता व अस्तित्व** | 294 |
| 90 | प्रा. प्रषांत देषमुख | महात्मा गांधी आणि राष्ट्रसंत तुकडोजी महाराजाचे ग्रामीण विकासाचे विचार | 299 |
| 91 | प्रा. राहुल लभाने | राष्ट्रपिता महात्मा गांधी यांनी सत्य व अहिंसा संदर्भातप्रकटकेलेले योगदान | 301 |
| 92 | प्रा.डॉ. उल्हासरामजीराठोड | 'महात्मा गांधी आणि असहकार आंदोलन' | 305 |
| 93 | प्रा संजीववि. भुयार | महात्मा गांधींच्या विचारातील गोसेवा आणि निसर्गोपचार -एक चिकित्सक अध्ययन- | 308 |
| 94 | संकेत सुरेशराव काळे | सत्याग्रहाची लोकशाहीतील भूमिका | 312 |
| 95 | डॉ. सविता खोकले | सत्याग्रही गांधीजी | 315 |




Scanned by TapScanner

ISBN NO.: 978-93-85882-06-7

गांधीजींच्या मते सत्यच प्राण असून, सत्य नाकारून जीवनात कोणत्याही नियमाचे व सिध्दांताचे पालन करणे कठीण आहे. मानवाला सत्यच हीतकारी आहे. सत्य फक्त व्यक्ती करीता आवश्यक नसून समाज व राष्ट्राकरिता सुध्दा आवश्यक आहे. संपूर्ण सत्य (मन, वचन व कर्म) यांचे पालन करून राजनिती, अर्थनिती, कुटूंब, राष्ट्रीय व आंतराष्ट्रीय संदर्भातही विचारात घेतले पाहिजे. गांधीजींच्यामते सत्य हे दुसऱ्यांच्या सुख-दुख यामध्ये सहभागी झाल्याने मिळते. अहिंसेकरिता सत्य आवश्यक आहे. अहिंसा विश्वाचा आत्मा आहे. ईश्वरीय प्रेमाने अहिंसा सबंधी आस्था निर्माण होते. गांधीजी अशाच अहिंसेला ईश्वर मानत होते आणि त्यांच्या करिता ईश्वरच सत्य होते.

संदर्भ ग्रंथ


१. निडक भारतीय व पाश्चिमात्य राजकीय विचारवंत - प्रा. अरविंद श्रृंगारपुरे

२. गांधी सामाजिक, राजनैतिक परिवर्तन -डॉ. हरिश कुमार

३. शोध महात्मा गांधींचा खंड १ -अरूण सारथी

४. गांधी और सांम्प्रदायिक एकता -सुनिल कुमार अग्रवाल

५. महात्मा गांधी अखेरचे पर्व -१,२,३ -प्यारेलाल

६. महात्मा गांधी आदिपर्व-१ -प्यारेलाल

७. सत्याचे प्रयोग- आत्मकथा

८. गांधी नावाचे महात्मा-संपादक रॉय किनीकर


## महात्मा गांधी आणि अहिंसा सिध्दांत


**डॉ. रमेश जी. सुरळकर**

राज्यशास्त्र विभाग प्रमुख

कला व विज्ञान महिला महाविद्यालय, मेहकर.


विसाव्या शतकातील महान वैज्ञानिक अल्बर्ट आईनस्टाईन यांनी महात्मा गांधीजींची थोरवी सांगतांना असे म्हटले की, महात्मा गांधी नावाचा माणूस या भूतलावर वावरला असेल, यावर येणाऱ्या काळातील पिढया विश्वास ठेवणार नाहीत.गांधीजींना अहिंसक विचारांचे शिक्षण ''बायबल'' मधून मिळाले. येशु ख्रिस्ताचे पुढील वाक्य त्यांच्या मनावर बिंबले होते. ''देवा,'' त्यांना क्षमा कर, कारण ते काय करतात हयांची त्यांना जाणीव नाही. तसेच टॉलस्टॉयच्या "The kingdom of God is within you" हया पुस्तकाने त्यांच्या अहिसेच्या विचाराला दृढता आणून दिली. सत्याइतकेच गांधीजींनी अहिंसेला अनन्यसाधारण महत्व दिले सत्य व अहिंसा एक दुसऱ्याला पुरक असणाऱ्या गोष्टी आहेत. सत्य व अहिंसा हे दोन्ही आत्म्याचे गुण आहेत, आत्म्याच्या शक्ती आहेत. अहिंसेच्या मार्गानेच सत्याप्रत पोहोचता येते. इतरांना शारीरीक क्लेश पोहोचविणे किंवा रक्तपात करणे म्हणजे हिंसा, इतका मर्यादित अर्थ गांधीजीना अभिप्रेत नव्हता तर दुसऱ्याचे मन दुखवणीणे म्हणजे देखील ते हिंसाच समजत होते. गांधीजींची अहिंसा निषेधात्मक, विधायक आणि निरपेक्ष स्वरुपाची आहे. महात्मा गांधींनी दक्षिण आफ्रिकेत असताना रंगभेद संघर्ष नष्ट करण्यासाठी अहिंसक सत्याग्रह आणि ही चळवळ यशस्वी करुन दाखवली. याच अहिंसक सत्याग्रहाच्या मार्गाने भारताला स्वातंत्र्य मिळवून दिले. अहिंसक सत्याग्रहाने समस्या सूटते आणि परस्परांत मैत्री, प्रेमसंबंध विकसित होत असतात. सत्य अहिंसा तत्वाने प्रभावीत होऊन संयुक्त राष्ट्र संघाने सर्व प्रतिनिधी राष्ट्रांच्या सर्वसम्मतीने जागतिक स्तरावर अहिंसा दिवस पाहण्याचा निर्णय घेतला आहे. आजच्या समाज जीवनात राजकरणात सुड, हिंसा, प्रतिकार, राग, रक्तपात, दहशतवाद यामुळे अशांतता निर्माण झाली आहे. या परिस्थीतीतुन मार्ग काढण्यासाठी व मानवी मुल्याची प्रस्थापना करण्यासाठी, विश्वशांतीसाठी गांधीप्रणीत अहिंसा हा एकमेव पर्याय आहे यात शंका नाही.

**म. गांधीचा अहिंसा सिध्दांत :-** गांधीच्या मते सत्य आणि अहिंसा या दोन्ही गोष्टी अविभाज्य आहेत. मात्र सत्य हे साध्य असून अहिंसा हे साधन आहे. जो माणुस सत्याचा उपासक असतो तो अहिंसेवर मनपर्वक प्रेम करतो. अहिंसा म्हणजे हिंसा करायची नाही एवढाच अहिंसेचा मार्यादीत अर्थ त्यांना अपेक्षीत नाही. त्यांचा अहिंसेचा अर्थ व्यापक आहे. क्रोधाने, स्वार्थासाठी अथवा दुखापत करण्याच्या इराद्याने दुसऱ्याला इजा करणे अगर ठार मारणे म्हणजे हिसा होय अशा प्रकारच्या कृती पासून मनाने आणि शरीराने दुर राहणे, म्हणजे अहिंसा होय कोणलाही त्रास अथवा दुःख होईल, असा विचार आचार, उच्चार न करणे ही खरी अहिंसा आहे. शरीरानेच नव्हे तर मनानेही कोणालाही इजा न करणे हाच गांधीप्रणीत अहिंसेचा अर्थ होय. त्यांच्या मते



Scanned by TapScanner

अहिंसा हा प्रेमाचा प्रतिशब्द आहे, त्यामुळे प्रेमात ज्या गुणांचा समावेश होतो ते सर्वगुण अहिंसेत समाविष्ट असतात. स्वतःच्या त्रासाची, कष्टाची पर्वा न करता दुसऱ्यांच्या सुखासाठी कार्य करणे हीच अहिंसेची खरी कसोटी आहे. गांधीच्या मते, अहिंसेचा अवलंब केला की सर्व गोष्टी आपोआप प्राप्त होतील म्हणून स्वराज्याच्या आधी मला अहिंसा अपेक्षीत आहे. अहिंसा तात्पुरती किंवा विशीष्ट काळापुरती मर्यादीत असत नाही तर सर्वकाळी, सार्वत्रीक व चिरंतन अशीच असते. म्हणून गांधी भारताच्या स्वातंत्र्यासाठी अहिंसक लढयाच्या कार्यक्रमाचा पुरस्कार करतात. परकीयाकडून केवळ शस्त्रबहानेच स्वराज्य मिळविता येणार नाही तर प्रेम बळानेही परकीयांच्या -हदयापर्यंत पोहचता येते. त्यामुळे स्वराज्य प्राप्तीसाठी अहिंसेचा मार्गच प्रशस्त आहे. कारण आपण मिळविलेले स्वराज्य हिंसा बळाच्या आधारे प्राप्त केले असेल तर त्याला स्वराज्य कसे म्हणतात येईल ? असे गांधी म्हणतात.

**अहिंसेचे प्रकार :-** म. गांधीनी अहिंसेचे चार प्रकार स्पष्ट केले आहेत.

१) **विधायक अहिंसा :-** म.गांधीच्या मते, विधायक अहिंसेने प्रेमाची, सत्याची प्राप्ती होते. एखाद्या व्यक्तीच्यां कार्यांत व्यत्यय न आणणे म्हणजेच विधायक अहिंसा होय. लहान मुलांना रडविणे, व्यक्तीचा अपमान, कामात व्यत्यय ही हिंसा ठरते. प्राणीमात्रांच्या कल्याणासाठी प्रयत्न करुन, जगात प्रेमाचे वातावरण बनविणे, यातुनच विधायक अहिसेंची निर्मीती होते.

२) **निषेधात्मक अहिंसा :-** प्राणीमात्रांची हत्या, क्रोध, निदर्यता घृणा, वाईट भावना इत्यादी सर्वार्थाने त्याग करणे म्हणजे निषेधात्मक अहिंसेची पुर्व तयारी आहे. आनंदी जीवनासाठी निषेधात्मक अहिंसा फलदायी ठरते. दुर्धर रोगाने ग्रस्तांना जीवे मारने अथवा गलीतमात्र झालेल्या वृध्दाला विष दिले तर ती हिंसा होणार नाही. कारण अशा व्यक्ती जीवंत असताना जीवनाचा खरा आनंद उपभोगु शकत नाही तो मृत्युमुळे त्यांना मिळतो.

३) **निरपेक्ष अहिंसा :-** या अहिंसेच्या प्रकारात संपुर्ण शाकाहारी असेणे व अहभांचावा त्याग करणे अपेक्षित असते अशी अहिंसा फक्त ईश्वराला शक्य असते. मानवासाठी अशी अहिंसा अशक्य आहे.

४) **नैतिक अहिंसा** :- म. गांधीच्या मते नैतीक अहिंसा व्यवहारात दिसुन येते, या अहिंसेचे त्यांनी दोन प्रकार केले आहेत.

**अ) वीर पुरूषांची अहिंसा** :- एखादी व्यक्ती सामर्थ्यशाली आसूनही अहिंसेचा पुजारी असते हि अहिंसा नैतीकता आणि विश्वास यावर आधारलेली आसून हि अहिंसा शुरविरांचे लक्षण आहे.

**ब) भित्र्यांची अहिंसा किंवा निकृष्ट अहिंसा** :- अहिंसेच्या नावाखाली भित्रेपणा दडविण्याचा प्रयत्न अशा अहिंसेत केला जातो. भित्रेपणा आणि अहिंसा एकत्र राहू शकत नाही.

**गांधीप्रणीत अहिंसा आणि संरक्षण :-** अहिंसेच्या मार्गाने व्यक्ती, समाज, राष्ट्र यांनी आपले रक्षण कसे करावे याचे उत्तरही गांधीजवळ आहे. त्यांच्या मते मुळातच अहिंसक राष्ट्रावर आक्रमण होण्याची शक्यताच कमी आहे. जर अहिंसक राष्ट्रावर आक्रमण झालेच तर आक्रमण करणाऱ्यांना सर्व मालमत्ता सोपवावी पण त्याबरोबरच त्यांना कोणत्याही प्राकरचे सहकार्य करुनये. त्याबरोबरच आत्मीक प्रतिकार करुन अत्याचारी माणसांच्या शस्त्राची धार बोथट करता येते. हजारो लोक बलिदान करण्यास तयार झाले म्हणजे आक्रमकांचे हदय परिवर्तन होऊ लागेल, भौतिक शस्त्रे व अस्त्रे कितीही बलवान आणि घातक असली तरी नैतीक आणि आध्यात्मिक अहिसेपुढे ती निर्बल आणि निरुपयोगी ठरतात. म. गांधीनी ब्रिटीशांच्या विरोधात जो लढा सुरु केला होता. तो अहिंसक असल्यामुळे ब्रिटीश सरकार सुधदा गोंधळात पडले. ब्रिटीशांच्या सदविवेक बुध्दी व हदयावर गांधी अहिंसेच्या मार्गाने आघात करीत होते. त्यामुळे या लढयात ते यशस्वी झाले व ब्रिटीशांना भारत सोडून जावा लागला. आक्रमकांच्या प्रतिकारासाठी आणि स्वातंत्र्याच्या रक्षणासाठी त्यांना उच्च मनोधर्य असलेली शुरांची अहिंसा योग्य वाटते. सर्व जगात शांतता राहावी शस्त्रास्त्र स्पर्धा नाहीशी व्हावी यासाठी शस्त्रास्त्र नियंत्रण व्हावे, त्यासाठी भारताने पुढाकार घ्यावा असे गांधीचे मत होते कारण भारत हा देश पिंडाने आणि स्वभावाने शांततावादी देश आहे. गौतम बुध्द, महावीर, सम्राट अशोक महात्मा बसवेश्वर यांनी शांतता अहिंसेचा संदेश दिला. भारत हा देशच अहिंसेच्या मार्गाने शांतता निर्मीतीसाठी जगाला नेतृत्व देऊ शकतो अशी गांधीची धारण होती.

**अहिंसा म्हणजे आत्मिक शक्ती :-** गांधीजी अहिंसेला आत्मिक शक्ती म्हणतात. पाशवी शक्तीचा प्रतिकार करणे हे कार्य अहिंसा या आत्मिक शक्तीवर ते सोपवितात, अहिंसेचे कार्य नकारात्मक नसून सकारात्मक आहे. अहिसंच्या तत्वांवर आधारित असा समाज एखाद्या प्रचंड कुटुंबासारखा असून त्यातील व्यक्तीचे संबंध प्रेमाचे व सौदार्हाचे राहतील. असे गांधीजी म्हणतात.

**मनाच्या आंतरमनाची अहिंसेवर श्रध्दा:-** केवळ गरज म्हणून गांधीजीनी अहिसेचा पुरस्कार केला नाही तर ती त्यांच्या मनाच्या आंतरमनातील प्रामाणिक अशी श्रध्दा होती. गांधीजी हे धार्मिक प्रवृत्तीचे असल्याने त्यांचा अहिंसेवरील विश्वास ही त्यांच्या धार्मिक अनुभूतीची एक शाखा होती.



330
Scanned by TapScanner

**मनुष्याची अपुरेपणाची जाणीव:-** गांधीजींना मनुष्याच्या अपुरेपणाची जाणीव होती, त्यामुळे ते म्हणत की, परिपूर्ण अहिंसा ही केवळ ईश्वरलाच साध्य होवू शकते. मनुष्य हा संपूर्ण पणे अहिंसा होवू शकत नाही. मानवी अपरिपूर्णतेमुळे काही ठिकाणी हिंसा अनिवार्य ठरते. गांधीप्रणित आदर्श राज्यात जरी बळाला जागा नसली तरी प्रत्यक्ष व्यवहारातून बलप्रयोग पूर्णपणे वगळता येत नाही. जो पर्यत मनुष्य हा समाजाचा घटक आहे तोपर्यंत समाजाच्या अस्तित्वात अंगभूत असलेल्या हिंसेला टाळता येत नाही.

**आत्मिक आध्यात्मिक सामर्थ्याची जाणीव व्हावी हा हेतू:-** भारत दुबळा आहे म्हणून अहिंसेचा मार्ग गांधीजींनी सांगितला नाही तर भारताला आत्मिक आध्यात्मिक सामर्थ्याची जाणीव व्हावी आणि आत्मविश्वासपूर्वक या लढयात तो उभा राहावा अशी गांधीजीची अपेक्षा होती आपल्याला आत्मा असुन तो अमर आहे. तो सर्व प्रकारच्या प्राकृतिक दुर्बलतेवर मात करु शकतो व संपूर्ण जगाशी टक्कर देवू शकतो, याची त्यांना भारताला जाणीव करुन द्यायची होती.

**अहिंसा ही शौर्याची चरमसीमा:-** ज्या माणसाच्या अंगी अहंकार, अहंमन्यता असेल तेथे अहिंसेचे वास्तव्य संभवत नाही. विनम्रिखेरीज अहिंसा अशक्य आहे. मात्र त्या विन्रमतेला कुणीही दुबळे समजू नये. गांधीजीं हणतात, माझा अहिंसेचा सिध्दांत ही एक अत्यंत प्रभावी शक्ती आहे. तेथे भित्रेपणाला व दुर्बलतेला मुळीच स्थान नाही. हिंसक माणूस केव्हा तरी अहिंसक होईल परंतु भित्रा माणसाच्या बाबतीत अशी आशा बाळगता येणार नाही कारण अहिंसा ही शौर्याची चरमसीमा आहे. अहिंसा अंगी बाळगण्यासाठी मोठी हिंमत व शौर्य लागते.

**अहिंसा हीं हिसेपेक्षा कित्येक पटीने श्रेष्ठ:-** गांधीजी म्हणतात, भित्रेपणा व हिंसाचार या दोघात निवड करताना ते हिंसाचाराची निवड करीन, स्वतःची अप्रतिष्ठा करुन मानहानीचे जीणे जगण्यापेक्षा शस्त्रबळाचा वापर करणे अधिक समर्थनीय, मात्र जेव्हा निवड हिंसा व अहिंसा या दोघांत करायची असेल तेव्हा अहिंसेची मी निवड करेन, कारण अहिंसा ही हिंसेपेक्षा कित्येक पटीने श्रेष्ठ आहे. क्षमाशीलता ही शिक्षा करण्यापेक्षा अधिक श्रेष्ठ ठरते.

**अहिंसा व संरक्षण:-** अहिंसेने राष्ट्राचे संरक्षण करता येते, असे जेव्हा गांधीजी म्हणतात, तेव्हा त्यांची भूमिका आंतरराष्ट्रवादी विचारकाची असते. आक्रमण व अतिक्रमण आपोआप नष्ट होतील अशी त्यांची अपेक्षा होती. म्हणजे मग संरक्षणाचा प्रश्न निर्माण होणार नाही. व्यक्तीने वा देशाने हिंसेव्दारे व दुसऱ्याचे शोषण करुन मिळविलेल्या गोष्टींचा त्याग केला पाहिजे गांधीजींच्या मते, अनैतिकतेला नैतिकतेनेच जिंकता येते. सुड भावना वगळून दुष्टपणाविरुध्द अधिक हिरीरीने लढा देणे म्हणजे अहिंसा होय.

**अहिंसक मार्गाने रक्षण करण्यासाठी आवश्यक तयारी :-** युध्दासाठी जशी तयारीची गरज असते, तशी अहिंसक मार्गाने संरक्षण करण्यासाठीही असते. त्यासाठी देशाची आर्थिक व सामाजिक जीवन सुरळीत करावे लागते. रचनात्मक मार्ग व सत्याग्रह याव्दारे सामाजिक संबंध बदलावे लागताता. त्याच मार्गाने धरिष्टय, निग्रह, सोशिकता इत्यादी गुंणाचीही जोपासना करावी लागते. मग कोणतेही शस्त्रबळ, अण्वस्त्र, अहिंसक सत्याग्रहिंना नमवू शकत नाहीत.

**गांधी प्रणीत अहिंसा आजच्या काळातही मोलांची :-** भगवान बुध्द, येशु, महावीर यांनी अहिंसेला धर्मात महतवाचे स्थान दिले परंतू म. गांधीनी प्रत्यक्ष व्यवहारात अहिंसेचे तत्व आणले. आज जीवनांच्या सर्वच क्षेत्रात हिंसेने धुमाकूळ घातला आहे. राजकारणांचे आध्यात्मीकरण करण्याचा त्यांचा विचार होता पण आज संसदीय लोकशाहीत सत्ता प्राप्तीसाठी मोठया प्रमाणात हिंसा केली जाते. सगळी ईश्वरांची लेकरे समान असली पाहिजेत, हा गांधी विचार प्रत्यक्षात न येता, मोठया प्रमाणात अर्थिक, सामाजिक विषमतेमुळे हिंसेला खतपाणी घातले गेले आहे. आज संघटीत आतंकवादी, दहशतवादी हा जगासमोरचा महत्वाचा प्रश्न आहे. भारतातील कित्येक राज्यात अशांततेचे साम्राज्य पसरले आहे. वैमनस्य आणि क्रोधातुन क्षणाक्षणाला हिंसेचा अवलंब केला जात आहे. आजच्या परिस्थीती तुन मार्ग काढण्यासाठी गांधीजीच्या अहिंसा मार्गाशिवाय पर्याय राहीला नाही. आज समाजामध्ये शांतता व सलोखा प्रस्थापीत करणे आवश्यक आहे. त्यासाठी गांधीजीच्या अहिंसा मार्गाचा स्वीकार करणे आवश्यक आहे. त्यामुळे त्यांचा विचार प्रत्यक्षात आणणे अवघड असले तरी ते आज आवश्यक बनले आहे. आजच्या स्फोटक परिस्थितीत दहशतवादी, नक्षलवादी हिंसेपासून जगाचे व भारताचे संरक्षण करावयाचे असेल तर गांधीचा अहिंसेचे विचार मार्गदर्शक आहेत.

**संदर्भ :-** गांधी एम.के आत्मकथा, नवजीवन पब्लीकेशन, अहमदाबाद, २००१ संपादक, लोकराज्य मुंबई

१) शिखरे दा.न. राष्ट्रपिता महात्मा गांधी

२) धर्माधिकारी दादा, सर्वोत्तम दर्शन

३) डॉ भोळे. भा. ल. आधुनिक भारतातील राजकीय विचार

४) गांधी एम.के माझे सत्याचे प्रयोग



Co-Ordinator IQAC
Scanned by TapScanner